# दि. २८/०१/२०१९ रोजीच्या ५७ व्या आमसभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई ची ५७ वी आमसभा वार- **सोमवार,** दि. **२८/०१/२०१९** रोजी **सकाळी ११.०० वाजता** ठिकाण : **संत गजानन महाराज इंजिनिअरींग कॉलेज सभागृह** शेगांव खामगांव रोड, शेगांव येथे **अध्यक्ष प्रकाश भिमराज कराळे** यांचे अध्यक्षतेखाली पार पाडली. सदरहू सभेत विषयवार झालेले चर्चेचे इतिवृत्त खालीलप्रमाणे.

**विषय नं. १ संघटनेच्या ५७ व्या आमसभेचे विषय पत्रिकेचे वाचन करणे.**

**ठराव क्र. १** संघटनेच्या ५७ व्या वार्षिक आमसभेचे आयोजन संत गजानन महाराज इंजिनिअरींग कॉलेज, येथे करण्यात आले, त्याअनुषंगाने आमसभेच्या विषयपत्रिकेचे वाचन करण्याची सुचना अध्यक्षांनी केली. त्यानुसार जनरल सेक्रेटरी श्री. शैलेश पाटील यांनी वार्षिक सभेतील १ ते ११ विषयांचे वाचन केले. याप्रमाणे अहवालात नमुद केलेली आमसभेची नोटीस स्विकारण्यात येऊन सभेचे कामकाज सुरु करण्यात आले. प्रारंभी महासचिव शैलेंद्र पाटील यांना दिवंगतांना श्रध्दांजली वाहण्याचा ठराव मांडला. श्रध्दांजली शब्दांकन वाचुन सभेत दोन मिनिट उभे राहून श्रध्दांजली अर्पण करणेत आली.

**सुचक : श्री. प्रकाश कराळे**
**अनुमोदक : श्री. संतोष दाणी**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं. २ लातूर अधिवेशन २८ जानेवारी २०१८ च्या ५६ व्या आमसभेचे इतिवृत्त कायम करणे.**

**ठराव नं. २** संघटनेची मागील सभा दि.२८/१/२०१९ रोजीच्या सभेचे इतिवृत्त वाचून दाखविण्याची सुचना मा. अध्यक्षांनी केली, त्याप्रमाणे जनरल सेक्रेटरी श्री. शैलेंद्र पाटील यांनी लातुर येथील ५६ व्या आमसभेतील विषय १ ते ११ व ऐनवेळी सुचलेले १ असे एकुण १२ विषयांचे वाचन केले त्यावर झालेल्या ठरावाच्या इतिवृत्ताचे वाचन केले. त्याप्रमाणे सदरचे इतिवृत्त सभेतील चर्चेनुसार बरोबर लिहिले असल्याने आजच्या सभेत वाचून कायम करण्यात येवून ठराव मंजूर करण्यात आला. सभेत सभासदांनी ५७वा अहवाल अत्यंत चांगला झाल्याचे भावना व्यक्त करुन पदाधिका-यांच्या कामकाजाचे अभिनंदन केले व ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. सुरेश देवरे**
**अनुमोदक : श्री. दिलीप कुलकर्णी**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं. ३** संघटनेचे २०१८-२०१९ ते २०२३-२०२४ या पंचवार्षिक निवडून आलेले सदस्य व नुतन पदाधिका-यांची नावे जाहिर करणे व नोंद घेणे.

**ठराव नं. ३** संघटनेच्या उपविधीनुसार सन २०१९-२२ या कालावधीसाठी संघटनेची कार्यकारणीची पंचवार्षिक निवडणुक दि. २७/१/२०१९ रोजी शेगांव याठिकाणी खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली. सदर पंचवार्षिक निवडणुकीत निवडून आलेले कार्यकारणी सदस्यांची व नव्याने निवड झालेल्या पदाधिका-यांची नांवे मा. निवडणुक निर्णय अधिकारी ॲड. विठ्ठल बडे यांनी सभेत वाचुन दाखविले ते पुढिल प्रमाणे

| अ. | नांव | जिल्हा | पद |
|---|---|---|---|
| १ | प्रकाश भिमराज कराळे | अहमदनगर | अध्यक्ष |
| २ | हेमंत निवृत्ती ढमढेरे | पुणे | महासचिव |
| ३ | दिनेश रंगनाथ पोरे | उस्मानाबाबद | वरिष्ठ उपाध्यक्ष |
| ४ | सुभाष रुस्तुमराव पाटिल | नांदेड | प्रवक्ते |
| ५ | सुभाष काशिनाथ बागड | नाशिक | कोषाध्यक्ष |
| ६ | अभिलाषा संजय नाईक | कोल्हापूर | परीक्षा सचिव |
| ७ | संतोष काशिनाथ झंजाड | ठाणे | प्रसिध्दीप्रमुख |
| ८ | अरुण फत्तेलाल चांडक | बुलढाणा | सहसचिव |
| ९ | संजय गोपाळराव नाईक | धुळे | उपाध्यक्ष |
| १० | संतोष आनंदराव दाणी | जालना | उपाध्यक्ष |
| ११ | घन:शाम वामनराव कुंबळकर | गोंदिया | उपाध्यक्ष |
| १२ | नंदकुमार मधुकरराव देशमुख | लातूर | उपाध्यक्ष |
| १३ | जोसेफ रुबेन | मुंबई | उपाध्यक्ष |
| १४ | अनुरथ घुमरे | अकोला | उपाध्यक्ष |
| १५ | प्रकाश रंगनाथ कुलकर्णी | सोलापुर | उपाध्यक्ष |
| १६ | रविकांत विठठलराव पवार | परभणी | उपाध्यक्ष |
| १७ | रणजिंत हनुमंत लेंभे | सातारा | उपाध्यक्ष |
| १८ | संजय बाबुराव राणे | रत्नागिरी | सदस्य / उपाध्यक्ष |
| १९ | समीर अशोक म्हात्रे | पालघर | सदस्य / उपाध्यक्ष |
| २० | नरेश वामनराव बोमेवार | गडचिरोली | सहकोषाध्यक्ष |
| २१ | रमेश मारोती कावळे | भंडारा | परीक्षा सहसचिव |
| २२ | अरविंद मोतीराम भगत | वाशिम | परीक्षा सहसचिव |
| २३ | कैलास शिवाजी जगताप | यवतमाळ | परीक्षा सहसचिव |
| २४ | प्रदीप श्रीधरराव कुलकर्णी | बीड | परीक्षा सहसचिव |
| २५ | अनिल जीवनधरराव कडू | अमरावती | परीक्षा सहसचिव |
| २६ | रामचंद्र प्रल्हादराव खत्री | वर्धा | परीक्षा सहसचिव |
| २७ | शैलेंद्र मनोहर पाटिल | नागपूर | सदस्य |
| २८ | गोवर्धन मोगलय्या विरकुंवर | हिंगोली | सदस्य |
| २९ | संजय गोपाळ लेडांगे | चंद्रपुर | सदस्य |
| ३० | महेश शिवाजी माळवदकर | औ.बाद | सदस्य |
| ३१ | प्रमोद बाळकृष्ण वाणी | जळगांव | सदस्य |
| ३२ | श्रीकांत केशव जोशी | सिंधुदुर्ग | सदस्य |
| ३३ | वासुदेव दत्तात्रय धुरकुंडे | नंदुरबार | सदस्य |
| ३४ | दिपक मासाळ | सांगली | सदस्य |
| ३५ | पंकज एकनाथ ठाकूर | रायगड | सदस्य |

वरीलप्रमाणे निवडणुक अधिकारी यांनी सन २०२४-२०२५ कार्यकारणी व पदाधिकारी यांचे निवड प्रक्रियेची माहिती सादर केली. तदनंतर संघटनेचे माजी पदाधिकारी यांनी नुतन पदाधिका-यांना पदभार देऊन नुतन पदाधिकारी व कार्यकारणी सदस्यांचे अभिनंदन करण्यात येवुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. व्यंकटेश कुटे**
**अनुमोदक : श्री. अशोक पावसे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.४ सन २०१७-२०१८ च्या अहवालाची नोंद घेणे (जनरल सेक्रेटरी अहवाल सादर करणे)**

**ठराव नं. ४** सन २०१७-१८ या वर्षात संघटनेने केलेल्या कामाचा अहवाल, आमसभा नोटिस व आर्थिक पत्रके प्रसिध्द करण्यात येऊन सर्व सभासदांना वितरीत करण्यात आली. संघटनेचे जनरल सेक्रेटरी श्री. हेमंत ढमढेरे व श्री. शैलेंद्र पाटिल यांनी सभेत अहवालाचे वाचन करुन उपस्थित सभासदांना संघटनेच्या व सभासदांच्या हितासाठी केलेल्या सर्व कार्याची इतंभूत माहिती अहवालात दिली असल्याने सर्व सभासदांनी त्याचे स्वागत केले. संघटनेचे आजीव सभासद तसेच नवीन झालेले आजीव सभासदांची संख्या, परीक्षा विभागाचे कामकाज, परीक्षेसाठी बसलेल्या विद्यार्थ्यांची जिल्हानिहाय संख्या इ. संघटनेने केलेल्या कामाचा गोषवारा सादर करण्यात आला. संघटनेची सांपत्तिक स्थिती, बँक खात्याची माहिती तसेच संघटनेने शासनाकडे सादर केलेल्या विविध मागण्यांची संपूर्ण माहिती अहवालातून प्रसिध्द केली आहे. अहवाल सालात आयोजित केलेले कार्यकारणी सभा, मेळावे आदींची सविस्तर माहिती दिली. ख-या अर्थाने संघटनेने ५७ व्या अहवालात अतिशय चांगली व इंतभुत माहिती सभासदांना लिखीत देवुन उत्तम काम केले आहे सभेमध्ये अहवालाची नोंद घेवुन सभासदांनी अभिनंदन करुन अहवाल स्विकारला व ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. जे. के. वाघमारे**
**अनुमोदक : श्री. तुळशीदास खसाळे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.५ मा. चार्टर्ड अकाऊटंट यांचेकडून प्रमाणित झालेले असोसिएशनचे ३१/०३/२०१८ अखेरच्या आर्थिक पत्रकांना मान्यता देणे. (आर्थिक पत्रके, अहवाल, वेबसाईट व प्रेरणा जनहित मंचमध्ये प्रसिध्द केले आहेत)**

**ठराव नं. ५** संघटनेचे ३१/३/२०१८ चे आर्थिक पत्रके मा. चार्टर्ड अकौंटट श्री. अभय कटारीया यांनी लेखापरिक्षण करुन प्रमाणित होऊन प्राप्त झालेले आर्थिक पत्रके आमसभेत कोषाध्यक्ष श्री. सुभाष बागड यांनी वाचून दाखविले. सदरच्या आर्थिक पत्रकांवर सभेत चर्चा होऊन संघटनेची आर्थिक स्थिती, बँक खात्यांतील शिल्लक, मुदत ठेवी आदिंची माहिती सादर केली गेली. संघटनेची सांपत्तिक स्थिती दिवसेंदिवस चांगली होत असल्याने समाधान व्यक्त करण्यात आले. सादर केलेले नफा-तोटा व ताळेबंद पत्रके मंजुर करण्यात आली व ठराव मंजुर करण्यात आला. या प्रसंगी विद्यमान कार्यकारिणीने कोणत्याही प्रकारचे प्रवास खर्च व मिटींग भत्ता न घेतल्याने कार्यकारिणीचा अभिनंदनाचा ठराव मंजुर करण्यात आला. तसेच कोषाध्यक्ष सुभाष बागड व सह कोषाध्यक्ष प्रकाश शहा यांचेही अभिनंदन करण्यात येवुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सुचक : श्री. यशवंत बोरसे**
**अनुमोदकः श्री. मिलिंद मुडे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.६ शासनाकडील व महाराष्ट्र राज्य परिषदेकडील मागण्याबाबत चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव नं. ६** शासनाकडील व परिक्षा परिषदेकडील त्याच बरोबर इतर विभागाकडील सादर करण्यात आलेल्या पुढील मागण्या सोडविणेकामी राज्य कार्यकारिणी सदस्यांनी प्रयत्न करावे असे ठरले.

**महाराष्ट्र राज्य शालेय शिक्षण विभागाकडील मागण्या :-**

१. संगणक टंकलेखन (जीसीसी-टिबीसी) कोर्स ३०,४०, स्पेशल स्किलमध्ये सुधारणा करुन सुधारित गुणदान योजनेस मान्यता देणे.
२. मॅन्युअल टंकलेखन स्किल, संस्थाचालकांची मागणी व विद्यार्थी वर्गाचा कल पाहाता मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम २०१९ नंतरही कायमस्वरुपी चालू ठेवणे.

३. संगणक टंकलेखन अभ्यासक्रम प्रभावीपणे राबविणेकामी परीक्षा परिषदेने स्वत:ची परीक्षा केंद्र तयार करणे अथवा शासन नियंत्रित मान्यता प्राप्त संस्थांना परीक्षा केंद्र उपलब्ध करुन देणेकामी सक्ती करुन शासन आदेश निर्गमीत करणे.

४. नोकरभरती, पदोन्नती परीक्षेसाठी सर्व विभागांनी टेस्ट एक्झाम पध्दतीचा अवलंब करणे (न्यायालयीन भरती प्रक्रियेप्रमाणे)

५. शासनाच्या सर्व विभागातून दिला जाणा-या संगणक अर्हता, कॉम्प्युटर प्रशिक्षण उपक्रमात महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या संगणक टंकलेखन (जीसीसी-टिबीसी) अभ्यासक्रमाचा समावेश करुन शुल्क शासनाचे आदेशाप्रमाणे अदा करणे.

६. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद संचलित संगणक टंकलेखन (जीसीसी-टिबीसी) अभ्यासक्रम शालेय शिक्षण क्रिडा विभागाचा असल्याने व महसूल शासनाला मिळणार असल्याने सर्व शाळांच्या शिक्षकांना संगणक अर्हता पूर्ततेसाठी जीसीसी-टिबीसी अभ्यासक्रमाचा समावेश करुन शुल्क शासनाचे आदेशाप्रमाणे अदा करणे.

७. सुधारित नियमावली १९९१-२०१६ मधील विशेष प्राविण्य (स्पेशल स्किल) ही ५० शप्रमि गतीची परीक्षा दोन सत्राऐवजी चार सत्रात घेणे अथवा सहा महिनेचे सत्र करुन त्यास डिप्लोमा दर्जा देऊन सर्व उच्च गतीच्या परीक्षांना पूर्वीप्रमाणे अट लागू करणे.

८. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेच्या अस्थापनेवरील वर्ग ३ व वर्ग ४ पदांची महानोकरी भरती प्रक्रियेव्दारे कायमस्वरुपी नियुक्ती करणे.

९. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून आकारण्यात येणारे उत्तरपत्रिका बाबत रु. ४००/- शुल्क रद्द करुन उत्तर पत्रिका ईमेलव्दारे रु. १००/- आकारणी करुन विदयार्थ्यांना न्याय देणे.

१०. शासनाने दुष्काळग्रस्त विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ केले असल्याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दुष्काळग्रस्त जिल्हयातील विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क (जून २०१८ ते डिसेंबर २०१८ या सत्राचे ) परत करावे.

११. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेवर शासनाकडून नामनिर्देशित करण्यात येणा-या व्यक्ती या अधिनियमाप्रमाणे वाणिज्य शिक्षण प्रवर्गातील असाव्यात. त्यात शासनमान्य संस्थेचे व्यवस्थापन मंडळ व प्राचार्य यांचीच अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करणे.

१२. शासनमान्य संगणक टंकलेखन संस्थांना सॉफ्टवेअर व परीक्षा डेमो मोफत अथवा अल्प दर उपलब्ध करुन देणे.

**महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभागाकडील मागण्या :-**

१. महाराष्ट्र शासनाच्या शासकिय व निमशासकिय नोकर भरतीच्या जाहिरातीमध्ये लिपीक टंकलेखक पदासाठी मॅन्युअल टंकलेखन ३०,४०,५० श.प्र.मि. किंवा शासन आदेश ३१ ऑक्टोबर २०१३ व राजपत्र ६ जुन २०१७ अन्वये संगणक टंकलेखन जीसीसी-टिबीसी ३०,४० श.प्र.मि. व स्पेशल स्किल ५० श.प्र.मि. या अभ्यासक्रमाची शैक्षणिक अर्हता लागू करणे.

२. महाराष्ट्र शासनाच्या शासकिय निमशासकिय लिपीक टंकलेखक भरती व वर्ग १ व वर्ग २ पदोन्नती साठी संगणक अर्हता पात्रता धारक म्हणून सामान्य प्रशासन, माहिती व तंत्रज्ञान विभागाचा दि. ४ फेब्रुवारी २०१३, ८ जानेवारी २०१८ व १६ जुलै २०१८ शासन आदेशाने MS-CIT समकक्षता दिलेल्या महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे च्या गर्व्हनमेंट सर्टिफिकेट इन कॉम्प्युटर टायपिंग बेसिक कोर्स (जीसीसी-टिबीसी) चा स्पष्ट उल्लेख करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन ऊर्जा विभागाकडील मागण्या :-**

१. शासनमान्य कॉम्प्युटर टायपिंग प्रशिक्षण देणा-या संस्थांना आरएल १० मध्ये समावेश करुन विदयुत पुरवठा युनिट दर कमी करणेबाबत आदेश देणे.

२. शासनमान्य प्रशिक्षण देणा-या संगणक प्रशिक्षण संस्थांना स्वतंत्र वीजबील भरणा केंद्र देणे.

**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडील मागण्या :-**

१. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने गठित केलेल्या समितीने संगणक अभ्यासक्रम गुणदान पध्दतीमध्ये सुचविलेल्या सुधारणा अहवाल शासनाला सादर करणे.

२. मॅन्युअल टंकलेखन स्कील, संस्था चालकांची मागणी व विदयार्थी वर्गाचा कल पाहाता मॅन्युअल टंकलेखन अभ्यासक्रम २०१९ नंतरही कायमस्वरुपी चालू ठेवणेकामी प्रस्ताव पाठविणे.

३. सुधारीत नियमावली १९९१-२०१६ मधील विशेष प्राविण्य (स्पेशल स्किल) ही ५० श.प्र.मि. गतीची परीक्षा दोन सत्राऐवजी चार सत्रात घेणे अथवा सहा महिन्याचे सत्र करुनत्यास डिप्लोमा दर्जा देऊन त्यास सर्व उच्च गतीच्या परीक्षांना पूर्वीप्रमाणे पूर्व अट लागू करणेबाबतचा प्रस्ताव सादर करणे.

४. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेच्या अस्थापनेवरील वर्ग ३ व वर्ग ४ पदांची महानोकरी भरती प्रक्रियेव्दारे कायमस्वरुपी नियुक्ती करणे.

५. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडून आकारण्यात येणारे उत्तरपत्रिका बाबत रु. ४००/- शुल्क रद्द करुन उत्तर पत्रिका ईमेलव्दारे रु. १००/- आकारणी करणेबाबत कार्यवाही करणे.(उत्तरपत्रिका देण्याचा कालावधी व पध्दती निश्चित करणे)

६. शासनाने दुष्काळग्रस्त विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क माफ केले असल्याने महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने दुष्काळग्रस्त जिल्हयातील विदयार्थ्यांचे परीक्षा शुल्क (जून २०१८ ते डिसेंबर २०१८ या सत्राचे ) परत करणेबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविणे.

७. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेवर टंकलेखन, लघुलेखन व संगणक तज्ञ समित्या गठीत करणेबाबत कार्यवाही करणे.

८. शासनमान्य संगणक टंकलेखन संस्थांना सॉफ्टवेअर, परीक्षा डेमो व अभ्यासक्रमाची पुस्तके मोफत किंवा अल्प दरात पुरविणेबाबत.

९. अनाधिकृत संस्था व अनाधिकृत विदयार्थी पायबंध घालणेकामी जीसीसी परीक्षा केंद्रावर सीसीटिव्ही कॅमेरा व बायोमेट्रिक हजेरी व जीसीसी-टिबीसी केंद्रावर वेब कॅमेरा पध्दतीचा अवलंब करणे.

१०. संगणक टंकलेखन परीक्षेचा निकाला ११ दिवसांत जाहीर करावा. रिपीटर विदयार्थ्यांची पुर्नपरीक्षा एक महिन्यांत घेण्यात यावी.

११. मॅन्युअल टंकलेखन संस्थांच्या नूतनीकरण व लघुलेखन अभ्यासक्रमासाठीच्या संगणक टंकलेखन संस्थांना मान्यता संगणक टंकलेखन ऑनलाईन करणे.

१२. लघुलेखन अभ्यासक्रमाबाबत नेमण्यात आलेल्या समितीच्या अहवालावर तातडीने निर्णय घेणे.

१३. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने हेल्पलाईन नंबर उपलब्ध करुन देणे व विदयार्थी व संस्थांना सर्व सूचना एसएमएस व्दारे पाठविणे.

१४. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेकडील संकेतस्थळावर एडिटऑप्शनसह दुरुस्तीच्या प्रिंट उपलब्ध करुन देणे.

**१५.** आवेदन फॉर्म परिपूर्ण असताना प्रमाणपत्रावरील फोटो बदल अथवा नाव दुरुस्ती प्रस्ताव मान्य करणे (याबाबत कालमर्यादा असावी )

वरीलप्रमाणे शासन, परीक्षा परिषद व इतर विभागाकडील मागण्या बाबत सविस्तर चर्चा झाली. सदरच्या मागण्या रास्त असून या मागण्या सोडविण्याकामी राज्य कार्यकारणीने योग्य तो पाठपुरावा करावा असे ठरले व ठराव मंजूर करण्यात आला.

**सुचक : श्री. अमोल एडणे**
**अनुमोदक : श्री. नाना डोंगरे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.०७ सन २०१९-२०२० या वर्षातील कामकाजाची रुपरेषा ठरविणे.**

**ठराव नं.०७** आजच्या सभेत सन २०१९-२० या वर्षाची रुपरेषा ठरविणेबाबत सभेत चर्चा करुन पुढिलप्रमाणे रुपरेषा ठरविण्यात आली.

१. असोसिएशनचे सभासद वाढविणेबाबत प्रयत्न करणे. २) संघटनेच्या स्तरावर जीसीसी, जीसीसी-टिबीसी सराव परीक्षांसाठी प्रत्येक जिल्ह्यातून विद्यार्थी संख्या वाढविणेबाबत प्रयत्न करणे. ३) अधिवेशनात सादर करण्यात आलेल्या मागण्यांचा पाठपुरावा करणे. ४) जिल्हा व विभागीय स्तरावर समित्या गठीत करण्याबाबत प्राधान्य देण्यात यावे. ५) पारदर्शक परीक्षा पध्दतीकामी उपाय योजना करणे ६) बायोमॅट्रिक हजेरी पध्दतीचा अवलंब करणेकामी प्रयत्न करणे. ७) जीसीसी-टिबीसी बुक प्रमाणेच वस्तूनिष्ठ प्रश्नसंच बुक तयार करणे. ८) जीसीसी-टिबीसी अभ्यासक्रमाची

दैनिके व इलेक्ट्रॉनिक मिडियावर जाहिराती करुन विद्यार्थी वाढीचा प्रयत्न करणे.

वरीलप्रमाणे २०१९-२०या वर्षीसाठी रुपरेषा ठरविण्यात आली त्यास सर्व सभासदांनी मंजुरी देऊन ठराव संमत करण्यात आला.

**सुचक : श्री. गिरीष टिभे**
**अनुमोदक : श्री. आर.जी. गवळी**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.८ संघटनेची प्रोसेसिंग फी, रॉयल्टीची नोंद घेणे.**

**ठराव नं. ८** संघटनेच्या स्तरावर उत्पन्नाचे साधन म्हणून त्याचबरोबर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करावयाच्या खर्चासाठी संस्थाचालकांकडून प्रोसेसिंग फी, जीसीसी-टिबीसी वर्गणी (रॉयल्टी), शासनमान्य संस्थांना ॲडमिशन प्रणाली व संघटनेच्या सराव परीक्षा यामाध्यमातून रॉयल्टी जमा केली जाते. ३१/०३/२०१८ च्या अहवालात रॉयल्टी रक्कम रु. ३ लाख १० हजार जमा झालेले असून परीक्षा शुल्क व इतर रु. १८,४१,८४१ जमा झाल्याचे आर्थिक पत्रकात नमुद आहे. मात्र प्रत्यक्षात रॉयल्टीची नोंद हेड वाईज नमुद करण्यात यावी जेणेकरुन नेमण्यात आलेल्या एजन्सीजकडून जमा झालेला लेखाजोखा सविस्तरपणे सभासदांना समजेल अशी चर्चा झाली. मा. अध्यक्ष यांनी जमा झालेल्या प्रोसेसिंग फीचा सर्व हिशोब तपासण्यासाठी नेमुण दिलेल्या समितीच्या अहवालानुसार सादर केला. त्यामध्ये जमा झालेली प्रोसेसिंग पद्धी, झालेला खर्च व शिल्लक रक्कम या विषयी समितीने सादरीकरण करुन सभासदांना इंतभुत माहिती दिली तसेच पुढिल आर्थिक पत्रकाम आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील व सर्व बँकिग व्यवहार ऑनलाईन करण्यात येतील असे सांगून ठराव मंजूर करण्यात आला.

**सुचक : श्री. महेबुब मोईनतुल्ले**
**अनुमोदक : श्री. अभिनय जोशी**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.९ संघटनेची नियमावली उपविधीची अंमलबजावणी कामी 'राज्यस्तरीय समन्वयसमिती' नेमणेबाबत.**

**ठराव नं. ९** सुधारीत नियमावली १९९१ अन्वये जिल्हा स्तरीय व विभागीय समित्या गठित करणेबाबतचे मा. आयुक्तांच्या परीपत्रकानुसार राज्यात समित्या गठित झालेल्या आहेत. संघटनेच्या मागणीनुसार जिल्हा संघटनांना राज्य संघटनेच्या सलग्नता देण्यात आलेल्या असुन जिल्हा समित्या स्थापन झालेल्या आहेत. राज्य संघटना, सभासद संस्था व जिल्हा संघटना या सर्वांचा समन्वय ठेवणे संघटनेच्या नियमावलीचे पालन होणे, सुधारीत नियमावलीचे पालन होणे, अनधिकृत संस्था व बेकायदेशीर स्थलांतर यामध्ये आपापसात निर्माण होणारे मतभेद चर्चेव्दारे सोडविणेकामी राज्यस्तरीय समिती गठित करण्याबाबतचा निर्णय घेण्यात येऊन या राज्यस्तरीय समन्वय समितीचे अध्यक्ष म्हणून वरिष्ठ उपाध्यक्ष दिनेश पोरे व समिती सदस्य म्हणून सह सचिव अरुण चांडक व महिला संस्थाचालक प्रतिनिधी व समन्वय समिती सदस्य म्हणून जेष्ठ संस्थाचालिका संध्याताई देशपांडे, संस्थाचालकांचे पुरुष प्रतिनिधी मनोज महाजन आणि ॲड. विठ्ठलराव बडे यांची सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात येवून ठराव मंजूर करण्यात आला.

**सूचक : श्री. रघुनाथ अडसुरे**
**अनुमोदनः श्री. राजेश चोथवे**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.१० शासनआदेश सुधारित नियमावलीचा अवलंब न करणा-या संस्थेचे सभासदत्व रद्द करणेबाबत निर्णय घेणे व केलेल्या कार्यवाहीस मान्यता देणे.**

**ठराव नं.१०** महाराष्ट्र व गोवा राज्यातील शासनमान्य वाणिज्य शिक्षण संस्थासाठी शासनाने सन १९९१ पुर्वीचे सर्व शासन आदेश व परीपत्रक निग्रहित करुन वाणिज्य शिक्षण संस्था सुधारित नियमावली १९९१ लागू केली या नियमावलीचे पालन करणेबाबत शिक्षण विभागाच्या स्तरावर उचित कार्यवाही होत नसल्याने महाराष्ट्र राज्य टंकलेखन संघटनेने मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपिठाात याचिका दाखल करुन तिचे तंतोतंत पालन करणेबाबतचे आदेश सर्व संबंधितांना बजावण्यात आले तसेच शासनानेही स्वतंत्र परीपत्रक काढून न्यायालयाच्या आदेशाची अंमलबजावणी करण्याच्या सुचना कामी शासन परिपत्रक निर्गमित केले तरीसुध्दा काही संस्था बेकायदेशीर स्थलांतर करत आहेत, अनधिकृत विद्यार्थी परीक्षेस बसवत आहेत अशा संस्थांचे सभासदत्व रद्द करुन त्यांना संघटनेची कोणतीही मदत करण्यात येवू नये असा राज्यकार्यकारणीने ठराव करुन अशा संस्थांचे सभासदत्व रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. अशा संस्था पुढिलप्रमाणे १) ओम साई टंकलेखन संस्था मानवत जि. परभणी या संस्थेची राज्यकार्यकारणी सभा दि. २१/१०/२०१८ विषय नं. ५ अन्वये नियमावलीचे पालन न करता दिलेली मान्यता असल्याने आलेल्या हरकती नुसार सभासदत्व रद्द करण्यात आले. २) लातूर येथील आमसभेतील चर्चेनुसार राज्य संघटनेवर प्रत्येक उपक्रमास जाणिवपुर्वक विरोध करणे सोशल मिडिया व शासनाकडे संघटनेच्या विरोधात पत्रव्यवहार करणे इ. कारणास्तव खुलासा मागवूनही समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्याने अभ्यंकर टाईपरायटिंग इन्स्टिटयुट, मुंबई, आदर्श टाईपरायटिंग इन्स्टि.,मुंबई, गुरुकुल टाईपरायटिंग इन्स्टि. मुंबई वैश्वानर टाईपरायटिंग इन्स्टि., माणगांव या संस्थांचे सभासदत्व रद्द करण्यात आलेले असून त्यास आजच्या आमसभेत मान्यता देण्यात येऊन ठराव मंजूर करण्यात आला.

**सूचक : श्री. चंद्रकांत कुलकर्णी**
**अनुमोदन: श्री. जीवन जाधव**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

**विषय नं.११ मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयावर चर्चा करुन निर्णय घेणे.**

**ठराव नं. १२** मा. अध्यक्षांचे परवानगीने काही विषय असल्यास त्या मांडण्याची सुचना सभासदांना करण्यात आली त्याप्रमाणे पुढील सभासदांनी त्यांच्या सुचना मांडल्या.

श्री. विजय ईश्वकार यांनी ऑब्जेक्टिव्ह विषयासंदर्भात विषय मांडला तसेच परीक्षा केंद्र व आयटी शिक्षक व केंद्र संचालक यांच्याबाबत तक्रारी केल्या. याकामी मा. अध्यक्षांनी योग्य ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. तुषार मुंढे यांनी संघटनेचे सॉफटवेअर खाजगी संस्थांना देण्यात येवु नये अशी मागणी केली ती मान्य करण्यात आली. श्री. विजय यादव यांनी परीक्षा परिषदेकडे एडिट सुविधा उपलब्ध करुन देणेबाबत सुचना मांडली याकामी प्रयत्न करणार असल्याचे अध्यक्षांनी सांगितले. श्री. अय्यर यांनी परीक्षा परिषदेकडील गोपनिय कामाचा विषय मांडला हि बाब परीक्षा परिषदेच्या अखत्यारीत असल्याने त्यावर सार्वजनिक चर्चा न करता अध्यक्ष आणि आयुक्त यांचेकडे मांडण्याचा निर्णय घेण्यात आला. श्री. कवाडे, भंडारा यांनी नोकरभरतीच्या जाहिरातीत ४ फेब्रुवारी १३ चा शासन आदेश अनिवार्य असल्याने जीसीसी-टिबीसी शासनाच्या सर्व विभागांनी अंमलबजावणी करावी या कामी प्रयत्न करणेसाठी संघटनेने प्रयत्न करावा असे सुचविले ते मान्य करण्यात आले. यशवंत बोरसे यांनी सहा महिने सत्र हा कालावधी ड्राप करुन वर्षात तीन सत्र घेणेबाबत सुचना केली याबाबत परीक्षा परिषदेकडे प्रयत्न केला जाईल असे सांगितले. श्री. नल्लेवार हिंगोली यांनी कळमनुरी या त्यांच्या तालुक्यात शासनमान्य संस्थाच ब्रँच उघडत आहेत व काही संस्था अनाधिकृत विद्यार्थी बसवत आहेत याकामी सुचना मांडली अशा संस्थांची माहिती उपलब्ध करुन त्यांचेवर कारवाई करण्याचे आश्वासन अध्यक्षांनी दिले. श्री. शेख सर इचलकरणी यांनी लघुलेखन अभ्यासक्रमातील अडचणी व

सुधारणा करण्याची सुचना केली ती मान्य करण्यात आली. पंचकुला गायकवाड, नांदेड व सुभाष पाटिल यांच्यातील तक्रारी संदर्भात सभेत चर्चा झाली हा वाद संघटना स्तरावर नसल्याने शिक्षणाधिकारी व शिक्षण उपसंचालक यांचेकडे मांडण्यात यावा त्यावर जो निर्णय होईल तो मान्य करण्यात यावा असे ठरले. जेष्ठ संस्थाचालक व्यंकटेश कुटे यांनी परीक्षांचा डेमो कायम स्वरुपी दयावा व सराव परीक्षा शुल्क कमी करण्यात यावे असे सुचविले. याकामी परीक्षा परिषदेस प्रविष्ठ होणारी विद्यार्थी संख्या संघटनेची झाल्यास म्हणजे १००% विद्यार्थी प्रविष्ठ झाल्यास शुल्क कमी करण्यात येईल असे सांगितले अशा प्रकारे चर्चा होवुन ठराव मंजुर करण्यात आला.

**सूचक : श्री. प्रकाश कराळे**
**अनुमोदनः श्री. अरुण चव्हाण**
**ठराव सर्वानुमते मंजूर**

सभेच्या शेवटी अध्यक्ष श्री.प्रकाश कराळे यांनी आपल्या मनोगतात ५७ व्या आमसभेच्या निमित्ताने आजीव सभासद मोठया संख्येने उपस्थित राहिले व सभेच्या कामकाजात सहभाग घेतला व एकमताने ठराव मंजुर केले. याकामी आभार मानुन राज्य संघटनेच्या वाढीसाठी व संस्थाचालकांच्या प्रगतीसाठी सातत्याने प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. ५७ वी आमसभा व ५७ वे राज्यस्तरीय अधिवेशन शेगांव येथे आयोजीत करुन सभासदांची उत्तम प्रकारे व्यवस्था करताना प्रामुख्याने संघटनेचे सहसचिव व स्वागताध्यक्ष अरुण चांडक, जिल्हाध्यक्ष मिलींद मुढे, जिल्हा सचिव रवि देशमुख, समस्थ बुलढाणा जिल्ह्यातील कार्यकारणी सदस्य व संस्थाचालकांनी तनमनधनाने सहकार्य करुन अधिवेशन यशस्वी केले. याबद्दल आमसभेत आभारदर्शक ठराव मंजूर करण्यात येवुन सभेचे कामकाज संपल्याचे मा. अध्यक्षांनी जाहिर केले.

**हेमंत ढमढेरे** — **जनरल सेक्रेटरी**

**प्रकाश कराळे** — **अध्यक्ष**

**महाराष्ट्र राज्य टंकलेखन लघुलेखन शासनमान्य संस्थांची संघटना, मुंबई**